वाचले क्र. १) मा.आयुक्त सो यांचेकडील परिपत्रक क्र.दि.११/०७/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

२) जाहिरात क्र. १९९/२०२३, क्र.वायसीएमएच/२९/कावि/३२३/२०२३, दि.२१/०७/२०२३.

३) मा. आयुक्तसो यांचेकडील दि.१७ /०८/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पी.जी.आय.वाय चव्हाण स्मृति रूग्णालय

क्र.वायसीएमएच/२९/कावि/३६१/२०२३

दिनांक- १७ /०८/२०२३

**विषय- यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता तात्पुरत्या स्वरूपात वरिष्ठ निवासी पदावर नियुक्ती आदेश देणेबाबत....**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय हे ७५०बेडचे आसून सध्या रूग्णालयामध्ये असणा-या कायम कर्मचारी (वर्ग १ ते ४) यांचेकडून रूग्णालयीन कामकाज करून घेतले जाते. परंतु रूग्णालयीन कामाचा वाढता व्याप पाहता आवश्यक असणारे मनुष्यबळ हे कमी पडत असल्याने वाढीव मनुष्यबळ हे तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता मानधनावर घेतले जातात. यापुर्वी सहा महिनेकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरणेत आलेल्या विषयांकित पदांचा नियुक्ती कालावधी दि.३१/०७/२०२३ रोजी संपुष्टात येत आहे. पुढील कालावधीसाठी सदरचे पदांची आवश्यकता असल्याने सदरची पदे भरणेकामी नव्याने जाहिरात प्रकटन उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये प्रसिध्द करणेत आलेली आहे. जाहिरातीनुसार वरिष्ठ निवासी पदाकरिता-१८५ ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत.

जाहिरातीनुसार पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची त्या- त्या विभागाचे विभागप्रमुख यांनी छाननीसह निवड करणेकामी शिफारस केलेली आहे. त्यानुसार पात्र उमेदवारांची गुणाणुक्रमे व आरक्षणानुसार निवड करणेकामी मा.अधिष्ठाता यांनी शिफारस केलेली आहे. निवड समीतीचे शिफारशीनुसार प्रस्तावालगत पात्र उमेदवारांची गुणाणुक्रमे/आरक्षणानुसार निवड करणेकामी निवडयादी जोडली आहे. त्यामध्ये निवड केलेल्या वरिष्ठ निवासी-४०उमेदवारांची निवडयादी सोबत सादर केलेली आहे. सदर उमेदवारांना ३६४ दिवस कालावधीकरिता पुढीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेत येत आहे.

अटी शर्ती-

१) रूग्णांसाठी उपलब्ध राहणे क्रमप्राप्त राहील. अपवादात्मक परिस्थितीत रूग्णालय सोडावयाचे असल्यास रूग्णालय प्रमुख यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२) रूग्णांशी सुसंवाद साधुन वैद्यकिय सेवेतील त्यांच्या तक्रारी, शंका, अडचणी दुर करणे. रूग्णांशी व्यवस्थित संभाषण न केलेबाबत व तशा तक्रारी आलेस आपली नेमणुक त्वरीत रद्द करणेत येईल.

३) नियुक्ती कालावधी संपल्यानंतर सेवा समाप्तीबाबत स्वतंत्र आदेश निर्गत केले जाणार नाहीत.प्रस्तुतची मुदत संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संदर्भात कोणत्याही प्रकराचा हक्क व दावा राहणार नाही.

४) नेमणुक कालावधीत नियुक्ती अधिका-यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल त्याप्रमाणे त्यांच्या सुचनांचे, निर्देशांचे वेळोवेळी पालन करावे लागेल. व वेळोवेळी वरीष्ठ सागंतील ती कामे करावी लागतील. कामकाजाच्या वेळेपेक्षा लेट आल्यास प्रत्येक ३ लेटला १ दिवसाचे वेतन वजा केले जाईल.

५) नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी एक महीना आगाऊ सुचना देऊन नेमणुक रद्द करुन घ्यावी तशी आगाऊ सुचना न दिल्यास त्यांच्याकडुन एक महीन्याचा मेहनताना वसुल करणेत येईल.

६) नियुक्ती कालावधीत कामकाज असमाधानकारक असल्याचे निर्दशनात आल्यास किंवा तक्रारी आल्यास नियुक्ती कालावधीच्या कोणत्याही स्तरावर त्यांची सेवा समाप्ती करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राहतील.

७) वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ यांनी रूग्णालयीन कामकाज करीत असताना रूग्णांचे केसपेपरवर लिहण्यात येणा-या नोट्स वर खाली स्वाक्षरी करुन स्वत: चे नाव टाकणे किंवा नावाचा शिक्का उमटवणे बंधनकारक राहील.

८) कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ यांनी संबधीत शाखेतील सर्व रूग्णांची अँडमिशन, इन्व्हेस्टिगेशन्स ऑपरेशन्स, डीस्चार्ज यामध्ये सुसत्रता आणणे, Interns च्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, तज्ञ डॉक्टारांच्या सल्ल्यानुसार पेशंटला ट्रिटमेंट देणे व वरील सर्व कामात सुसुत्रता राखणे ही मुख्य कामे कनिष्ट निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ यांना करावी लागतील.

९) ज्या युनिट/ डिपार्टमेंट मध्ये नियुक्ती केलेली असेल त्या युनिट/डिपार्टमेंट च्या प्रशासकिय व संपुर्ण रूग्णसेवेची व त्या अनुषंगाने उदभवणा-या सर्व कामांची (Patient Management) जबाबदारी अध्यापक स्तरा नंतर संबधीत वरिष्ठ निवासी,कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ वर राहील.

१०)डिपार्टमेंट /युनिटमध्ये काम करीत असताना Internes व Clinical Teaching व Lecture ची जबाबदारी कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ वर पुर्णपणे राहील.

११)नेमणुकीच्या संदर्भात कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ ने दिलेली कोणतीही माहीती खोटी आहे. असे निर्देशनात आल्यास व आपले कामकाज समाधानकारक नसलेस अथवा आपल्या सेवेची आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्व सुचना न देता व तशी खात्री पटल्यास कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अथवा कारणे दाखवा नोटीस व तत्सम नोटीस न बजावता महापालिका सेवेतुन कमी केले जाईल व त्याबाबत संबंधीत उमेदवार यांना कोर्टात दाद मागता येणार नाही.

१२) कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ यांना ६ महीन्यातुन फक्त ४ दिवस किरकोळ रजा मिळेल. अन्य रजा (सार्वजनिक सुट्यासहीत) देय राहणार नाहीत. अन्य कारणास्तव गैरहजेरी विनावेतनी करण्यात येईल.अपवादात्मक परिस्थितीत ही रजा पुढच्या महीन्यात देणेबाबत विभाग प्रमुखांना अधिकार राहतील.

१३)कितीही दिवस एकत्रीत सेवा झाली तरी वेतनवाढ अथवा अन्य कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत. तसेच रजा प्रवास भत्ता सानुग्रह अनुदान व बोनस देय राहणार नाही.

१४)नेमणुक कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संबधाने कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा राहणार नाही.अशी सेवा एकुण (Aggregate) कितीही झाली तरी उमेदवारास सेवेत नियमित स्वरुपाची नेमणुक आपोआप मिळणार नाही.

१५)सदर कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ यांनी उपस्थितीसाठी बायोमेट्रीक दिवसातुन दोन वेळा करणे व मस्टरवरती सही करणे बंधनकारक राहील. ज्या दिवसाचा थंम्ब नसेल त्या दिवसाचा पगार अदा केला जाणार नाही.

१६)तात्पुरत्या स्वरूपातील मानधनावरील नियुक्ती नोकरी नाही. त्यामुळे वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. याबाबत रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

१७)आयकर नियमाप्रमाणे देय मानधनामधून TDS वजा करुन अंतिम रक्कम अदा करणेत येईल.

१८)कामावर वेळेवर हजर राहुन ओळखपत्र व गणवेश परिधान करणे. बंधनकराक राहील अन्यथा दंडात्मक कारवाई करणेत येईल. तसेच वॉर्ड इनचार्ज नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१९)नेमणुक झालेल्या उमेदवारांनी रुजु झाल्याबरोबर बँक ऑफ बडोदा ,पी.सी.एम.सी. मध्ये खाते उघडुन त्याचा क्रमांक व पॅन कार्डची झेरॉक्स संबधीत पगार लिपीकाकडे द्यावे. सदर बाबींची पुर्तता न केलेस पगारास विलंब झालेस त्यास रुग्णालयीन प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२०)आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आत रुजु न झालेस सदरचा आदेश रद्द करण्यात येईल. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगर पालिका
पिंपरी-१८

प्रती श्री/श्रीम डॉ.----------------------------------------

प्रत, १) लेखा विभाग,
२)संबधीत पगारबील लिपीक

प्रपत्र अ

(नेमणूक कालावधी दि.१७/०८/२०२३ ते दि.१६/०८/२०२४ अखेर ३६४ दिवसांकरिता विद्यावेतन)

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | दरमहा विद्यावेतन र.रु. | मिळाले ले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.दिव्या गजाननराव शेळके | एम.डी.मेडिसीन | खुला | खुला | मेडिसीन | ८०२५०/- | ७ |
| २ | डॉ.प्राची सुनिल हुडलीकर | एम.डी.मेडिसीन | खुला | खुला | मेडिसीन | ८०२५०/- | ६ |
| ३ | डॉ.विनीत सुरेशराव राठोड | एम.डी.पीडीएॅट्रीक | विजा-अ | विजा-अ | बालरोग | ८०२५०/- | ९ |
| ४ | डॉ.रिया सिंग | एम.डी.पीडीएॅट्रीक | खुला | खुला | बालरोग | ८०२५०/- | ९ |
| ५ | डॉ.शिवम जन्नावार | एम.डी.पीडीएॅट्रीक | खुला | खुला | बालरोग | ८०२५०/- | ८ |
| ६ | डॉ.शुभम सुरज गडकर | एम.डी.डर्मेटॉलॉजी | खुला | खुला | त्वचारोग | ८०२५०/- | ८ |
| ७ | डॉ.मधूर मुरलिधरजी राठी | एम.डी.सायकॅट्री | खुला | खुला | मानसोपचार | ८०२५०/- | ७ |
| ८ | डॉ.शौनक सुभाष तुवर | एम.एस.सर्जरी | खुला | खुला | सर्जरी | ८०२५०/- | ८ |
| ९ | डॉ.अक्षय रमेश जाधव | एम.एस.ऑर्थो. | अनु.जाती | अनु.जाती | अस्थीरोग | ८०२५०/- | ६ |
| १० | डॉ.अभिनव सिंग | एम.एस.ऑर्थो. | खुला | खुला | अस्थीरोग | ८०२५०/- | ७ |
| ११ | डॉ.स्नेहा सौदागर बनसोडे | एम.एस.ई.एन.टी | अनु.जाती | अनु.जाती | कान-नाक-घसा | ८०२५०/- | ६ |
| १२ | डॉ.वर्षाराणी गेनु मुठे | एम.एस.ई.एन.टी | खुला | खुला | कान-नाक-घसा | ८०२५०/- | ९ |
| १३ | डॉ.यशिश प्रदिप तायडे | एम.एस.ऑप्थ. | अनु.जाती | अनु.जाती | नेत्ररोग | ८०२५०/- | ६ |
| १४ | डॉ.कोमल अनिलकुमार मालपानी | एम.एस.ऑप्थ. | खुला | खुला | नेत्ररोग | ८०२५०/- | [illegible] |
| १५ | डॉ.रचना सुहास बरकले | एम.एस.OBGY | अनु.जाती | अनु.जाती | स्त्रीरोग | ८०२५०/- | ८ |
| १६ | डॉ.आदिती मुलचंद राठोड | डि.एन.बी. OBGY | विजा-अ | विजा-अ | स्त्रीरोग | ८०२५०/- | ५ |
| १७ | डॉ.केतकी जयंत पाटील | एम.एस.OBGY | इमाव | इमाव | स्त्रीरोग | ८०२५०/- | ८ |
| १८ | डॉ.रुची विष्ट | एम.एस.OBGY | खुला | खुला | स्त्रीरोग | ८०२५०/- | १० |
| १९ | डॉ.नितिका हिमांशू शर्मा | एम.एस.OBGY | खुला | खुला | स्त्रीरोग | ८०२५०/- | ७ |
| २० | डॉ.मोहम्मद फैजान आलम | एम.एस.ऑर्थो. | खुला | खुला | इम.वॉर्ड | ८०२५०/- | ६ |
| २१ | डॉ.सोनाली भीमराव वाघमारे | एम.डी. | अनु.जाती | अनु.जाती | आय.सी.यू. | ८०२५०/- | ६ |
| २२ | डॉ.वर्षा शिंदे | एम.डी. | खुला | खुला | आय.सी.यू. | ८०२५०/- | ५ |
| २३ | डॉ.पुनम राजेंद्र माने | एम.डी. | खुला | खुला | आय.सी.यू. | ८०२५०/- | ४ |
| २४ | डॉ.प्रियंका सुनिल कोंगे | एम.डी.अनेस्थी. | अनु.जाती | अनु.जाती | भुलशास्त्र | ८०२५०/- | ६ |
| २५ | डॉ.स्वप्निलकुमार मा.लेमले | एम.डी.अनेस्थी. | अनु.जाती | अनु.जाती | भुलशास्त्र | ८०२५०/- | ८ |
| २६ | डॉ.मीनाक्षी यादोराव कळाम | एम.डी.अनेस्थी. | अनु.जमाती | अनु.जमाती | भुलशास्त्र | ८०२५०/- | [illegible] |
| २७ | डॉ.प्रांजल राजेंद्र पिंपरकर | एम.डी.अनेस्थी. | इमाव | इमाव | भुलशास्त्र | ८०२५०/- | ७ |
| २८ | डॉ.कल्याणी अवधूतराव दांडगे | एम.डी.अनेस्थी. | इमाव | इमाव | भुलशास्त्र | ८०२५०/- | ६ |
| २९ | डॉ.मोना प्रकाश बसंतवाणी | एम.डी.अनेस्थी. | खुला | खुला | भुलशास्त्र | ८०२५०/- | ७ |
| ३० | डॉ.अजिंक्य संजय अमृते | एम.डी.अनेस्थी. | खुला | खुला | भुलशास्त्र | ८०२५०/- | ८ |
| ३१ | डॉ.केतकी मिलींद श्रोत्री | एम.डी.अनेस्थी. | खुला | खुला | भुलशास्त्र | ८०२५०/- | ७ |
| ३२ | डॉ.श्रुती भूषण पाटील | एम.डी.अनेस्थी. | खुला | खुला | भुलशास्त्र | ८०२५०/- | ६ |
| ३३ | डॉ.प्रगती संजय भगत | एम.डी.अनेस्थी. | खुला | खुला | भुलशास्त्र | ८०२५०/- | ५ |
| ३४ | डॉ.कनिष्ककुमार का.रावणकोलकर | एम.डी.रेडिओ. | अनु.जाती | अनु.जाती | रेडिओलॉजी | ८०२५०/- | ६ |
| ३५ | डॉ.सुरज नेमराव थोटे | एम.डी.रेडिओ. | खुला | खुला | रेडिओलॉजी | ८०२५०/- | १० |
| ३६ | डॉ.प्रिया प्रकाश माळवे | एम.डी.पॅथोलॉजी | अनु.जाती | अनु.जाती | पॅथोलॉजी | ८०२५०/- | ९ |
| ३७ | डॉ.पुनम मोतीराम राउत | एम.डी.पॅथोलॉजी | खुला | खुला | पॅथोलॉजी | ८०२५०/- | ९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | डॉ.गीतांजली चौधरी | एम.डी.मायक्रो. | खुला | खुला | सूक्ष्मजीवशास्त्र | ८०२५०/- | ५ |
| ३९ | डॉ.विनय कुमार | एम.डी.कम्यु.मेडि. | अनु.जाती | अनु.जाती | कम्यु.मेडिसीन | ८०२५०/- | ४ |
| ४० | डॉ.वंदना कश्यप | एम.डी.कम्यु.मेडि. | खुला | खुला | कम्यु.मेडिसीन | ८०२५०/- | ६ |

क्र.वायसीएमएच/७/कावि/ ३६९ /२०२३
दिनांक- १७ /०८/२०२३

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगर पालिका
पिंपरी-१८